# Dedicated Covid Health center (DCHC)

# Bulletin

**31.05.21**

# MSCDA ने दिली ४ लाखांची औषधे

## वैजनाथ जागुष्टे यांचा पुढाकार



**Matrumandir-Devrukh**

MATRUMANDIR DCHC

# Daily Patient Update

**31.05.21**

| | Total Capacity | Total Occupancy | Available Beds |
|---|---|---|---|
| Total Beds | 30 | 16 | 14 |
| With O2 | 8 | 0 | 8 |
| Without O2 | 13 | 10 | 3 |
| Icu beds | 9 | 6 | 3 |
| Ventilators | 0 | 0 | 0 |

**संपर्क : - SMS हॉस्पिटल**

**7798241390 / 02354260026**

# मावशींचे प्रेम लाभलेला
# वैजनाथ



आपल्या सभोवताली अनेकवेळा कर्तृत्ववान, आपल्या क्षेत्रात अभूतपुर्व यश संपादन करणारी आणि फार मोठा सन्मान मिळविणारी व्यक्तिमत्व असतात, आमच्या बरोबर ती अगदी सामान्यातल्या सामान्य व्यक्तिप्रमाणे वावरत असतात. मग आम्हीही त्यांना तसेच अनेक वेळा गृहीत धरुन चालतो. मात्र ज्यावेळी आपल्या गावा बाहेर जिल्ह्याबाहेर या व्यक्तिमत्वाच्या कार्याबद्दल लोक आदराने भरभरून बोलू लागतात तेंव्हा आपणच आश्चर्यचकीत होतो.

माझा वर्गमित्र वैजनाथ जागुष्टे हा असाच एक अफलातून माणूस आहे. डाव्या हाताने दिलेले उजव्या हाताला समजणार नाही आणि समजून देणार नाही अशा कलंदर वृत्तीचा. सामाजिक कार्य हे तर त्याच्या डीएनएचाच एक भाग त्यामुळे त्यासाठी काही विशेष बातमी प्रसिध्दि लागतच नाही.

काही वर्षांपूर्वी केमिस्ट त्यांची संघटना यासंदर्भात चर्चा करतांना मला समजले वैजनाथ जागुष्टे नावाची व्यक्ति या संघटनेच्या राष्ट्रीय पातळीवरील कार्यकारीणीत महत्वाची पदाधिकारी आहे.

माझा तर प्रथम विश्वासच बसेना! भोंदे शाळा ते कॉलेज एका वर्गात टार्गट असणारे आम्ही, बॉम्बे मेडिकल स्टोअर इतकच माहीत होते . तर चक्क हाच निघाला. केमिस्ट ड्रगीस्ट असोसिएशन मध्ये राज्य पातळी पासून देश पातळीवर याचं फार मोठ काम आहे. अनेक प्रश्न त्याने मोठ्या कौशल्याने हाताळतांना आपले नेतृत्व सिध्द केले आहे.

सतत देशात भ्रमंती सुरु असते. आणि विशेष म्हणजे या क्षेत्रात त्याच्या शब्दाला मोठा मान आहे. आणखी महत्वाचे वैशिष्ट्य देश पातळीवर काम करीत असला तरी देवरुखच्या मातीची नाळ अगदी तितकीच घट्ट लाल मातीत रुतलेली.

त्याला मातृमंदिरशी जोडून घेतले. एक तज्ञ मार्गदर्शक म्हणून. कोविड डेडीकेटेड सेंटर सुरु करण्यापुर्वी आम्ही सखोल चर्चा केली यांत वैजूने सुरवातीलाच औषधांची काही प्रमाणात जबाबदारी घेत व्यक्तिगत पातळीवर २०,०००/- औषधे दिली होती. मात्र कोविड रुग्णांना उपचारादरम्यान येणारा औषधांचा मोठा खर्च लक्षात घेऊन महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगीष्ट असोशिएशन च्या माध्यमातून मातृमंदिरच्या 'डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरला' जवळपास 4 लाख किमतीची औषधे मिळवून दिली. यातून येथील प्रत्येक कोविड रुग्णांसाठी पाच हजार रुपयाची औषधे मोफत देण्यात येणार असल्याचे मातृमंदिर कार्योपाध्यक्ष नाना कोळवणकर यांनी सांगितले .

'मातृमंदिरचा रुग्णसेवेचा वारसा व याबाबतीत देवरुख परिसरात असलेली आपुलकी यामुळेच आम्ही असोसिएशनच्या माध्यमातून औषधांची मदत करताना विश्वासाने 'मातृमंदिर कोविड सेंटरची निवड केली' असं असोशिएशनचे राष्ट्रीय पदाधिकारी वैजनाथ जागुष्टे यांनी याप्रसंगी सांगितले.

यापुढेही कोणत्याही प्रकारची औषधे लागल्यास असोशिएशन मदत करेल असं आश्वासन वैजनाथ जागुष्टे यांनी दिले. याच वेळी त्यांनी 200 कोविड रुग्णांच्या एका दिवसाच्या जेवणाच्या व्यवस्थेसाठी आर्थिक मदत असोशिएशनच्या वतीने देण्याचे जाहीर केले.

या निमित्ताने जागुष्टे यांनी काही आठवणींना दिलेला उजाळा फारच महत्वाचा आहे. आपण लहानपणी आई सोबत मातृमंदिरला आलो की आम्ही मावशींना भेटत होतो त्यावेळी मावशी श्रीखंडाची कधी खेबर्याची वडी द्यायच्या, आजही त्या वडीची चव आणि मावशींचे त्यातील ओतप्रोत भरलेले प्रेम आठवते. या वडीची चव इतकी अवीट अप्रतिम होती की, इकडे येतांना मावशींकडे जायचेच हा माझा हट्ट असायची. आज या आठवणींनेही मन रोमांचीत होते . वैजनाथ जागुष्टे यांची आठवण मावशींच्या मायेच्या ओलाव्याची सावली आणि आधार देणारा आहे.


देवरुख येथील १०० गावांतील सर्वसामान्यांसाठी अद्ययावत रुग्णालयाचे स्वप्न साकारणे हेच ध्येय पुढे नेणे आहे. मावशींच्या मायेच्या छत्रछायेत असे अनेक वैजनाथ देश परदेशात कर्तृत्वाने चमकत आहेत. त्यांना साद घालणे महत्वाचे. या निमित्ताने ते बंध अधिक मजबूत करु या!

- अभिजित हेगशेटये






Thank You



# कोळपे काका

विलास कोळपे, उपाध्यक्ष-मातृमंदिर म्हणजे आम्हा सार्यांचे कोळपे काका यांचे सदैव महत्त्वपूर्ण योगदान असते. मातृमंदिर फार्मवरील सेंद्रिय कलिंगड कृषी प्रकल्पाच्या यशस्वीतेनंतर कोविड काळात मुलांनी त्यांना घराबाहेर आता जाऊ नका अशी प्रेमाची सक्ती केली, आणि कोळपेकाका अ‍ॅानलाईन गतीमान झाले.

कोळपे काकांचा संपर्क अफलातून आहे. सामाजिक चळवळीतील देशपातळीवरील मान्यवर, नाट्य, सिने कलाकार, बँकर्स, उद्योजक आदी ज्यांना भेटण्याने आम्हावर स्वर्गीय आनंदाचा शिडकाव होतो असे दिग्गज कोळपे काकांच्या सामाजिक कार्याच्या विलक्षण प्रेमात असतात याचा अनुभव मी टेक्सास येथे बीएमएम कन्व्हेंशनला जेष्ट अभिनेते संजय मोने यांच्या कडून मिळालेल्या उत्सफुर्त प्रतिसादात घेतला आहे. महाराष्ट्राचे लाडके अभिनेते वैभव मांगले मी रंगभूमीवर कसा पोहोचलो याचे श्रेयच कोळपे काकांना आपल्या प्रत्येक जाहिर मुलाखतीतून देतात.

एखाद्या संस्थेकडे कोळपे काकासारखा पीआर असणे ही त्या संस्थेची फार मोठी (अ‍ॅसेट ) शक्ति आहे. कोळपे काकांच्या परिवारातील योगदान हे अनमोल आहे. संस्थेच्या भावी प्रकल्पात मोठा निधी उभारण्याची गरज लागणार याचे स्वप्न यांच कणखर भरभक्कम आधारावर आपण चितारत आहोत.

**कोळपे काकांचे विशेष आभार**

# चॅम्पियन

# प्रतिक



लॉक डाऊनने अनेक सक्षम लोकांना संधी नाकारल्या आणि त्यांच्या प्रगतीचे मार्गही तात्पुरते रोखले. त्यातीलच एक प्रतिक.

देवरुख, सावर्डे सारख्या ठिकाणी शिक्षण घेत प्रतिक कबड्डी खेळायला लागला आणि आपल्या उत्कृष्ठ खेळाने अगदी नॅशनल पर्यंत झेप घेत स्वतःला सिध्द केलं. कॉलेजनंतर मुंबईत महिंद्रा सारख्या नामांकित कंपनीकडून खेळायला लागला. परंतु काही काळातच कोरोनाचा विळखा सुरु झाला आणि प्रतिकला गावी परतावं लागलं.

सध्या प्रतिक आपल्या मातृमंदिर डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरला काम करतो. त्याचा सर्व ठिकाणचा अनुभवी वावर पहिला तर त्याचं नक्की डीपार्टमेंट कोणतं हा प्रश्नच पडावा. जितक्या कुशलतेने तो ऑक्सिजन सिलेंडरची जोडणी करतो तितक्याच सहजतेने वॉर्डमध्ये डॉक्टरांना असिस्ट करतो. आलेल्या इक्व्युपमेंटची जोडणी असो किंवा लाईट-पाण्याचा प्रश्न प्रतिक सगळीकडे मेन रोलमध्ये. सोबतच त्याच्या गोड स्वभावामुळे प्रत्येक पेशंटची त्याला निट माहिती असते. देवरुखमधला त्याचा प्रचंड जनसंपर्क पहिला कि त्याचं माणूस म्हणून मोठेपणही लक्षात येत.

राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आज कोविड रुग्णांची सेवा करतोय. प्रतिक तुझा आम्हाला अभिमान वाटतो.



Proud of you

# MATRUMANDIR DCHC

## मातृमंदिर कोविड सेंटरला ३६ हजारांची मदत

### माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम; सोशल मीडियाचा उपयोग

» विधायक

सकाळ वृत्तसेवा


साडवली, ता. २८ : प्रत्येक शहराची ओळख असणारी काही ठिकाणे असतात. देवरूख येथील मातृमंदिर ही अशीच संस्था असून स्वातंत्र्यपूर्व काळापासून ज्या शाळेचे अभिमानाने नाव घेतले जाते, त्या न्यू इंग्लिश स्कूलच्या १९८४ दहावी बॅचमधील माजी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर करत ... येत मातृमंदिर कोविड हॉ... हजार रुपयांचा धन...

आमदार शे... उपस्थितीमध्ये... हेगशेट्ये ... देण्यात ... पुरोहि... पुढ...



देवरूख : मातृमंदिर कोविड सेंटरला आर्थिक मदत देताना माजी विद्यार्थी.

... रोज संपर्कात ... मातृमंदिर ...



मैत्रिणींनी पुढाकार घेत प्रयत्न केले व यातून जमा झालेली रक्कम सुपूर्द केली.

मातृमंदिर संस्थेच्या संस्थापिका ...वशी हळबे यांचे सर्वांना ... आणि त्याही त्यांना ... पिळाव्यात,

हे स्वप्न मातृमंदिर पूर्ण करत असून आणि कोरोनाच्या या कठीण काळात देवरूखसारख्या ठिकाणी ऑक्सिजन आणि आयसीयूसह सुविधा उपलब्ध केल्याबद्दल या सर्व माजी विद्यार्थ्यांनी संस्था पदाधिकारी यांना धन्यवाद दिले. यापुढे संस्थेच्या अशा उपक्रमात सोबत असल्याचे सांगितले.

## MSCDA ची देवरुख मातृमंदिर कोविड सेंटरला चार लाखांची औषधांची मदत

देवरुख दि. ३० : कोविड रुग्णांना उपचारादरम्यान येणारा औषधांचा मोठा खर्च लक्षात घेऊन महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगीस्ट असोशिएशन च्या माध्यमातून देवरुख मातृमंदिरच्या 'डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरला' जवळपास ४ लाख किमतीची औषधे देणगीस्वरूपात देण्यात आली.

मातृमंदिरचा रुग्णसेवेचा वारसा व याबाबतीत देवरुख परिसरात असलेली आपल... यामुळेच

असोसिएशनच्या माध्यमातून औषधांची मदत करताना विश्वासाने 'मातृमंदिर कोविड सेंटरची निवड केली' असं असोशिएशनचे राष्ट्रीय पदाधिकारी वैजनाथ जागुष्टे यांनी याप्रसंगी सांगितले.

याच वेळी त्यांनी २०० कोविड रुग्णांच्या एका दिवसाच्या जेवणाच्या व्यवस्थेसाठी आर्थिक मदत असोशिएशनच्या जाहीर ...

जागुष्टे यांनी दिले.

डॉ प्रकाश पाटील यांनी कोविड सेंटरची आतापर्यंतची रुग्णसंख्या, रिकव्हरी रेट आणि घेतली जाणारी काळजी याबाबत माहिती दिली. तसेच मातृमंदिरचे कार्योपाध्यक्ष कोळवणक... असो...

## मातृमंदिर कोविड सेंटर आता डेडिकेटेड

### सुविधांत वाढ; फिनोलेक्सतर्फे ५ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर

साडवली, ता. २९ : मावशी हळबे यांचा समाजसेवेचा वसा पुढे चालवणाऱ्या मातृमंदिरने कोविड सेंटर सुरू करून कोविड रुग्णांची चांगली सोय केली आहे. आता अद्ययावत सोयीसुविधांसह डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरमध्ये त्याचे रूपांतर झाले आहे.

याच सेंटरसाठी रत्नागिरीच्या फिनोलेक्स कंपनीच्या मुकुल माधव फाउंडेशनतर्फे पाच ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरची मदत केली. हे पाच ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर चिपळूण-संगमेश्वरचे आमदार शेखर निकम यांच्या हस्ते कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी फिनोलेक्सचे जनरल मॅनेजर तानाजी काकडे, तहसीलदार सुहास थोरात, गटविकास अधिकारी नरेंद्र रेवंडकर, देवरूख नगरपंचायतीचे मुख्याधिकारी बालाजी लोंढे, एसएमएस हॉस्पिटलचे डॉ. परमेश्वर गौंड, फिनोलेक्सचे डॉ. अनुप करमरकर, अभिषेक साळवी, सेंटरचे समन्वयक सतीश शिर्के, संचालक विलास कोळपे, सामाजिक कार्यकर्ते युयुत्सु आर्ते, अपना बँकेचे संतोष केसरकर, अयुब कापडी आदी उपस्थित होते.



देवरूख : मातृमंदिर कोविड सेंटरसाठी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देताना फिनोलेक्स कंपनीचे अधिकारी.

अभिजित हेगशेट्ये यांनी या मदतीबाबत फिनोलेक्सच्या श्रीमती छाब्रिया तसेच तानाजी काकडे आणि आमदार शेखर निकम यांचे विशेष आभार मानले. दानशूरांच्या देणगीमुळे, सहकार्यामुळे कोविड रुग्णांना अल्प दरात सेवा उपलब्ध करून देता येत आहे, असे हेगशेट्ये यांनी नमूद केले. शेखर निकम यांनी आवश्यक ती सामुग्री उपलब्ध करून देऊ, असे सांगितले.

# MATRUMANDIR DCHC

